**उपनिबंधक, सहकारी संस्था, ता. औरंगाबाद यांचे कार्यालय,**
लक्ष्मी अपार्टमेंट, मोतीवाला कॉम्प्लेक्स् समोर, नागेश्वरवाडी रोड, निराला बाजार, **औरंगाबाद-१.**
*(Telephone No. (0240)2970603; Email Id : drcs.aurangabad@gmail.com)*

जा. क्र. प्रशा ८/नि. मनोमय रेसिडेन्सी गृनिससंम/नोंदणी/ 3879 /२०२१. दिनांक :- २२ ऑक्टोबर, २०२१

प्रति,
श्री. आनंद राधाकृष्ण सातारकर,
मुख्य प्रवर्तक,
नियोजित मनोमय रेसिडेन्सी फ्लॅट ओनर्स को- ऑपरेटिव्ह
हाऊसिंग सोसायटी मर्या., प्लॉट नं. ३१ ते ४३, गट नं. ५८, सातारा, औरंगाबाद.

विषय :- नियोजित मनोमय रेसिडेन्सी फ्लॅट ओनर्स को- ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी मर्या., प्लॉट नं. ३१ ते ४३, गट नं. ५८, सातारा, औरंगाबाद या संस्थेच्या नावास व बँक खाते उघडण्याकरिता मान्यता देणेबाबत...

संदर्भ :- आपला विषयांकित प्रस्ताव दि. २१ ऑक्टोबर, २०२१.

वरील विषयाकडे आपले लक्ष वेधण्यात येत आहे.

उपरोक्त विषयाचे अनुषंगाने आपण संदर्भीय प्रस्तावाद्वारे नियोजित मनोमय रेसिडेन्सी फ्लॅट ओनर्स को- ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी मर्या., प्लॉट नं. ३१ ते ४३, गट नं. ५८, सातारा, औरंगाबाद. या नियोजित सहकारी संस्थेच्या नावाने बँकेत खाते उघडण्यास परवानगी देण्याची विनंती केलेली आहे. आपण केलेल्या विनंतीनुसार उक्त नियोजित संस्थेच्या नावे नोंदणीसाठी व भविष्यकाळातील ह्या कार्यालयाशी पत्रव्यवहार करण्यासाठी नियोजित संस्थेचे नाव आरक्षीत करून ठेवण्यात येत आहे. यापुढे पत्रव्यवहार करताना संस्थेच्या नावाच्या सुरुवातीला **'नियोजित'** शब्द ठळक अक्षरात नमूद करावा. आपल्या नियोजित संस्थेस औरंगाबाद जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक म., औरंगाबाद शाखा अदालतरोड, औरंगाबाद येथे खालील अटींना अधीन राहून खाते उघडण्यास परवानगी देण्यात येत आहे :-

१. नियोजित संस्थेस बँकेत खाते उघडण्यास परवानगी म्हणजे नोंदणीची हमी नव्हे.
२. ह्या कार्यालयाचे परवानगी पत्राच्या तारखेपासून दोन महिन्याच्या आत नियोजित संस्थेचे नोंदणी प्रकरण आवश्यक त्या सर्व कागदपत्रासह या कार्यालयास नोंदणीसाठी दाखल करावे. नोंदणी प्रस्ताव मुदतीत प्राप्त न झाल्यास बँक खाते उघडण्यास देण्यात आलेली परवानगी रद्द करण्यात येईल याची नोंद घ्यावी.
३. नियोजित संस्थेचे कार्यक्षेत्र **'जागेपुरते'** मर्यादित राहील.
४. वरील अ. क्र. २ मध्ये नमूद केल्याप्रमाणे परवानगी रद्द झाल्यास खात्यात शिल्लक असलेली भागाची रक्कम नियोजित संस्थेच्या मुख्य प्रवर्तकाने या कार्यालयाचे पूर्वपरवानगीने काढावी व ज्या प्रवर्तकांनी रक्कम भरणा केलेली असेल, त्यांना त्यांचे हिस्स्याप्रमाणे रक्कम या कार्यालयाने प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याच्या उपस्थितीत एक महिन्याचे आत परत करावी.

५. या कार्यालयाच्या पूर्वपरवानगीशिवाय नियोजित संस्थेची नोंदणी होईपर्यंत आपणास बँकेतून रक्कम काढता येणार नाही.

६. मुख्यप्रवर्तक यांनी नियोजित संस्थेच्या ४२ प्रवर्तक सभासदांनी रु. २५२००/- एवढी रक्कम भरणा करावी.

(प्रवीण फडणीस)
**उपनिबंधक,**
**सहकारी संस्था, ता. औरंगाबाद**

प्रत :-
शाखाधिकारी, औरंगाबाद जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक म., औरंगाबाद शाखा अदालतरोड, औरंगाबाद यांना योग्य त्या कार्यवाहीस्तव रवाना.

**उपनिबंधक,**
**सहकारी संस्था, ता. औरंगाबाद**